म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना. ना.
दा. क्र. ११७६३

IRBK-0111763
IRBK-0111763

अनुक्रम ०२५१
विभाग ८१:९१
क्रमांक 326
नों. दि. २४/३/५४

## १. फुलांचा जन्म

एकदा काय गंमत झाली.
बागेतील सारी फुले रुसली.
झाडांना घट्ट धरून बसली.
माणूस आला,
फुले तोडू लागला.
पण एकही फूल तुटेना.
माणूस काही हटेना.
मग माणसाने झाडच उपटले.
देवाच्या डोक्यावर ठेवून दिले.



IRBK-0111763

माणसाने केली पूजा,
देवाला वाटली मजा.
आज ही काय सजा ?
रात्र झाली. वनदेवी बागेत आली
तिने पाहिले. तिला नवल वाटले,
आज हे काय असे झाले ?
जुनी फुले गेली नाहीत,
नवीन कळ्या आल्या नाहीत.
तिने फुलांना विचारले.
एकेक फूल बोलू लागले.

" आम्हांला म्हणतात गोजिरवाणे.
आमचे जिणे लाजिरवाणे.
दुसऱ्यासाठीच आमचे जगणे.
दुसऱ्यासाठीच आम्ही मरणे.
फूल फूल फुलावे. दुसऱ्यांनी भुलावे.
आमच्याजवळ यावे.
आम्हांला तोडून घ्यावे.
सुवास घ्यावा. हौस करावी.
शोभा वाढवून मजा आणावी.

मग आम्ही सुकून जातो.
माणूस आम्हांला फेकून देतो.

माणसांचा देव, दगडाची मूर्ती.
करतो इच्छापूर्ती अशी गातात कीर्ती.
आमचे मात्र काहीच नाही.
आम्हांला काही किंमत नाही.
मानापुरते मानतात.
दगडाच्या अंगावर ठेवतात.
अंगात सुई टोचतात.
दोऱ्यात माळ ओवतात.
गळ्यात भूषण घालतात.
अन्यायाची सीमा झाली.
आता सेवा पुरे झाली.
इतके दिवस सहन केले.
दुसऱ्यासाठी जीवन दिले.
आता आम्ही केला विचार.
आम्ही आता सेवा घेणार !
वनदेवी माते, आमचा हट्ट पुरवा.
त्या दगडांना आमची सेवा करायला लावा."

फुलांचे बोलणे ऐकून घेतले.
वनदेवीला वाईट वाटले.
तिने राग आवरला.
थोडा विचार केला.

" तसेही एकदा होऊ दे.
फुलांची हौस फिटू दे.
यांना एकदा देव भेटू दे !
फुलांना दगडाकडून सेवा मिळू दे !"
वनदेवी हसली. ती फुलांना म्हणाली,

" असा हट्ट करू नका.
झाडाला चिकटून राहू नका.
एकत्र येऊन सारे बसा.
सेवा घेऊन भरपूर हसा.
दगडांना मी हुकूम देते.
तुमची सेवा करायला लावते ! "

वनदेवीने दिलासा दिला.
फुलांना मोठाच आनंद झाला.
सारी फुले सुटली.
झाडावरून खाली आली.
एकत्र ढीग करून बसली.
सेवा घेण्यास आतुर झाली.
दगडांची वाट पाहू लागली.
वनदेवीने आज्ञा केली.
देवळातून एक मूर्ती आली.



फुलांच्या ढिगावर उभी राहिली.

मग मात्र मजा आली.

मूर्तीच्या भाराने फुले चिरडून गेली.

मूर्तीचा झाला भार.

फुले झाली बेजार !

कण्हत ओरडत फुले म्हणाली.

“ अरे अरे देवा, तुझा वाटला हेवा.

पण नको आम्हांला ही सेवा !

पुरे झाला हा मान.

सजा मिळाली छान !

आमचा तर चालला जीव,
देवीमाते, सोडीव सोडीव ! ”
देवीने दगड उचलला.
फुलांचा ढीग मोकळा केला.
फुलांवरून हात फिरवला.
त्यांचा हट्ट पूर्ण केला.
देवी म्हणाली, “ बाळांनो,
दुसऱ्यांची सेवा करण्यात जो आनंद आहे
तो आनंद दुसऱ्यांकडून सेवा घेण्यात नाही.
सेवा करण्यात सुख आहे.
त्यासाठीच आपला जन्म आहे.
सेवेचे व्रत सोडू नका.
दुसऱ्यांचा हेवा करू नका. ”
“ दुसऱ्यासाठी जगणे,
म्हणजे मोठेपणाचे वागणे. ”
हे देवीचे बोलणे फुलांना पटले.
तक्रार करणे, त्यांनी सोडून दिले.

卐 卐 卐

## १. निवड चुकली

एकदा काय गंमत झाली.
कोल्होबाला भूक लागली.
फीर फीर फिरले. जंगलात खूप शोधले.
शेवटी गावाजवळ गेले.

गावाजवळ मळा होता.
मळ्यात खूप खाऊ होता.
कोल्होबाला आनंद झाला.
कोल्होबा मळ्यात जाऊ लागला.

पण मळ्याला होते कुंपण.
बापरे ! आत कसे जाणार ?
कोल्होबाने उंच उडी घेतली.
पण उडी चुकली.

" आईग, आता कसे होणार !
तारांचे काटे टोचणार ! "
मग कोल्होबाने पलटी घेतली,
जवळच्या झाडाची फांदी धरली.

ते झाड होते बाभळीचे:
त्याला काटे फार असायचे.

कोल्होबाने आधार घेतला.
बाभळीचा काटा पंजात शिरला.

कोल्होबा रडू लागले.
अरेरे हे काय झाले !
पंजात काटे मोडले.
भळभळ रक्त चालले !

ज्याचा आधार घेतला,
त्यानेच घात केला.
कुंपणाचे काटे चुकवायला गेलो,
तर बाभळीच्या काट्यात सापडलो.

कोल्होबाचे बोलणे बाभळीने ऐकले.
बाभळीचे झुडूप बोलू लागले–
" कोल्होबा, कोल्होबा, असे काय रडता ?
माझ्या नावाने उगीच का कण्हता !

माझा आधार घ्यायला मी नाही सांगितले.
तुमची उडी चुकली म्हणून तुम्हीच मला धरले.
मला कोणी धरले, तर त्याला काटे टोचणार.
हाच माझा धर्म, त्याला मी काय करणार ? "


बाभळीचे बोलणे कोल्होबाला पटले.
कण्हत कण्हत कोल्होबा मनाशीच बोलले :

" बाभळीवर उडी घेतली,
माझीच निवड चुकली !

पाहून मैत्री करावी.
चांगल्यांची संगत धरावी.
उतावीळ कधी होऊ नये.
वाईटाच्या तडाख्यात जाऊ नये.

कोणाला पाय लावू नये.
कोणाच्या पाया पडू नये.
उगीच आता रडू नये.
म्हणून आता जपायचं
काढता पाय घेऊन
इथून निघून जायचं !"





## ३, कोल्होबांची फजिती

तळ्याचे काम चालू होते.
खूप मजूर जमले होते.
त्यांनी भाकरी बांधून आणल्या होत्या.
झाडाच्या ढोलीत त्या ठेवल्या होत्या.

झाडाची ढोली म्हणजे
खोडामधील पोकळ भाग.
तेथे भाकरी ठेवल्या.
त्या एका कोल्होबाने पाहिल्या.

ढोलीजवळ कोल्होबा गेले.
त्यांनी आत डोकावून पाहिले.
" भूक फार लागली आहे !
भाकरीची आयती सोय झाली आहे."

ढोलीचे तोंड लहान होते.
तरी कोल्होबाला आत जायचे होते.
त्यांनी अंग चोरले.
आणि हळूच ते आत शिरले.

कोल्होबा सपाटून जेवले.
मागचे-पुढचे नाही पाहिले.

कोल्होबाचे पोट तट्ट फुगले.
कोल्होबा खूपच लठ्ठ बनले.

झाले इथवर ठीक झाले.
पण पुढे नशीब आडवे आले.
कोल्होबाला ढोलीबाहेर निघता येईना.
काय करावे ते त्यांना काहीच सुचेना.



अनुक्रम ८०२५८
बा. वा.
३२–५
२५।२।८

मग कोल्होबा ओरडू लागले.
मोठमोठ्याने रडू लागले.
त्याचे रडणे दुसऱ्या कोल्ह्याने ऐकले.
धावत येऊन त्यांनी सारे सारे विचारले.

"असा कसा अधाशी
विचार नाही केलास !
दुसऱ्यांच्या भाकरीवर
सपाटून ताव मारलास !

अन्न लोकांचे, पण पोट आपले.
हे तुला नाही कसे कळाले ?
भाकरी केल्या गट्ट, पण पोट फुगले तट्ट
बनलास गलेलठ्ठ पण डोक्याने तर मठ्ठ."

"नकोस बाबा बोलू आता
तू सोबती माझा भला !
बाहेर कसा येऊ मी
तो उपाय सांग मला !"

"अंग चोरून आत गेलास, तसाच बाहेर नीघ.
सडपातळ हो पहिल्यासारखा. तोवर वाट बघ !"
अविचाराने काम केले, त्याचे फळ असे मिळाले.
भल्याभल्यांना धडे मिळाले, धीर गंभीर झाले.

थोड्याच वेळाने कामकरी आले.
त्यांनी कोल्होबाला बाहेर ओढले.
चार चांगले फटके मारले.
कोल्होबा धूम ठोकीत पळून गेले !

卐 卐 卐

# १. एकदा काय झालं ?

एकदा काय झालं ?

एका सरदारानं एक गाढवाचं पिलू विकत घेतलं.

गुबगुबीत अंग, लोकरीसारखे केस.

सरदाराला ते पिलू फार आवडलं.


गाढवाच्या पिलाची तो फार काळजी घ्यायचा.

काही दिवसांनी ते पिलू मोठं झालं.

ते आता गाढव दिसू लागलं.

मोठं पोट, बारीक पाय, लांब लांब कान !

मालक त्याला चांगलं खायला द्यायचा,



पण ते खाणं सोडून गाढव उकिरड्यावर जायचा.
मालकाला त्याचा खूप राग यायचा !

गाढवाचा उपयोग मालकाला खूप व्हायचा.
ओझं वाहून न्यायला, तुरतुर पळायला.

खाण्याचा खर्च नाही, संभाळण्याची कटकट नाही.
म्हणून मालक आपला राग आवरायचा !
पुढं एकदा मजा झाली—

गाढवाच्या मालकानं एक कुत्रा पाळला.
कुत्रा फार छान होता.
तो शेपूट हालवायचा.
मालकाच्या भोवती फिरायचा.
खूप खूप खेळायचा.
कधी कधी तर त्याच्या मांडीवर बसायचा.

गाढवानं ते पाहिलं, त्यालाही खेळावसं वाटलं.
ते म्हणाले, "कुत्रा वागतो, तसा मीही वागेन."

मग गाढव नाचू लागला.
मालकाभोवती फिरला.
मालकाच्या अंगावर उड्या मारू लागला.

मालकाला राग आला.
त्यानं एक सोटा घेतला.
वेड्या गाढवाला बडवून काढला !

गाढव बिचारा ओरडू लागला.
चार दिवस आजारी पडला !
मालकाला दया आली.
त्यानं गाढवाची काळजी घेतली.
पुढं एकदा काय झालं ?
सरदार निघाला शिकारीला.
बंदुक घेतली. पोशाख केला.
फराळाचा डबा गाढवावर बांधला.
शिकारीसाठी कुत्राही बरोबर आला.

जंगलात फिरले, खूप खूप दमले.
एका मोठ्या झाडाखाली सरदार झोपले.
कुत्र्याला भूक लागली,
त्याला भाकरीची आठवण झाली.
कुत्रा म्हणाला गाढवाला,
" मित्रा, खाली बस ना,
पाठीवरची भाकरी मला थोडी दे ना ! "


गाढव त्याला ऐटीने बोलला.
" छे छे गड्या, असं कसं करता येईल ?
मालकाला कळाल्यावर तो मला मारील !
जरा थांब, धीर धर,
मालक उठेपर्यंत भूक तुझी आवर ! "

कुत्र्याला आला गाढवाचा राग,
पोटात भडकली भुकेची आग.
इतक्यात काय मजा झाली—
झाडीत एक सिंह दिसला.
सिंहाला पाहून गाढव घाबरला.
भीत भीत कुत्र्याला म्हणाला,
“ मित्रा, मला वाचव, माझा जीव चालला ! ”
कुत्रा शांत बसला.
तो हळूच गाढवाला बोलला,
“ मला भूक आवरत नाही, मला काम करवत नाही.
थांब जरा, धीर धर, मालक उठेपर्यंत भीती आवर.
धनी जागा होईल, मग तुझं रक्षण करील ! ”
इतक्यात सिंह जवळ आला.
गाढव भीतीने ओरडू लागला.
मालक झटकन जागा झाला.
बंदुकीने त्याने सिंह ठार केला.
सरदारने सिंहाचे कातडे काढले.
गाढवाच्या पाठीवर पांघरूण घातले.
आनंदाने गाढव दूर उधळून गेले !
पुढे गाढवाची आणखी मजा झाली.
जंगलाल्या प्राण्यांनी तो गाढव पाहिला.
त्यांना वाटलं, सिंहच धावत इकडं आला.

" पळा रे पळा ऽ पळा रे पळा ऽ
सिंह आला आहे आपल्याला खायला ! "

सारे प्राणी भिऊन पळाले !
ते पाहून गाढवाला अवसान चढले.
प्राण्यांच्या पाठोपाठ गाढव पळत सुटला.
गडबड पाहिली, कोल्होबांनी विचार केला.

" हा कसला सिंह ? गाढवासारखा धावतो.
सिंहाचं कातड घेऊन गाढवच पळतो. "
कोल्होबानं ओळखलं. गाढवापुढं गेला.
" राजेसाहेब, थांबा जरा, प्रधान तुमचा आला. "
कोल्होबानं मान दिला. गाढवाला अभिमान वाटला.



आनंदानं गळ्यातून मोठा सूर काढला !
सूर ऐकून सारे प्राणी तिथं जमा झाले.
" गाढव तो गाढवच ! " हसून बोलू लागले.
गाढवाचा आवाज सरदाराने ऐकला.
कुत्रा घेऊन तोही धावत तिथं आला.
पाहातो तर गाढवाभोवती खूप प्राणी जमले.
ठोऽठोऽबंदुकीनं त्यानं काही मारले.
आनंदानं सरदारानं गाढवाची पाठ थोपटली.
"तुझ्यामुळं मित्रा, आज चांगली शिकार लाभली."
गाढवानं फुर्रर्र केलं. चार लाथा झाडल्या.
आनंदानं धन्याभोवती खूप उड्या मारल्या.
कुत्र्यालाही गंमत वाटली. गाढव सोबती आपला,
शिकारीवर पोटभर त्यानं ताव मारला !


नंतर तिघे घरी आले,
आनंदानं राहू लागले.
सरदार सांगतो ज्याला त्याला,
" शहाणा गाढव माझा भला ! "

" कितीही केलं, कसंही झालं,
तरी गाढव तो गाढवच ! "
असं लोकांनी उगीच दूषण दिलं !
गाढवाच्या गोष्टीचं नवल फार केलं !

卐 卐 卐


अनुक्रम ४०२५
विभाग बा. वा
क्रमांक ३२
नों. दि. २५

# ७. कळीचा नारद



एकदा काय झाले ?
फिरत फिरत नारदमुनी काशी क्षेत्रात गेले.
एकादशीचा दिवस होता,
नारदांना उपवास होता.
दुपार टळून गेली, नारदांना भूक लागली.
नारद वाण्याच्या दुकानी गेले.
एक आण्याचा खजूर मागू लागले.
नारदाचे ध्यान वाण्याने पाहिले.

नारदाला त्याने झटकन् ओळखले.
" कळीचे का नारद ? " विचारपूस केली.
" कशाला रे चौकशी ? खजूर दे आधी ! "
" कळ कशी लावता, ते पहायचंय मला. "
" कशाला रे हट्ट ? मोकळा कर मला. "
" वाटेल ते होऊ द्या. गुण दाखवा बरा,
कळ लावा आज इथं, मजा पाहू जरा. "
" ठीक आहे वाणीबुवा, मध आणा थोडा. "
महाबळेश्वरी मध, पुढे ठेवला घडा.
बोट बुडवलं नारदानं, मध थोडा घेतला.
जमिनीवर मधाचा त्या पट्टा त्यानं काढला.
थोडा वेळ गेल्यावर एक मुंगळा आला.
मुंगळा रुतला मधात, तो तडफडू लागला.



मुंगळ्याला पाहून एक चिमणी आली.
मधात पाय रुतले, फडफड करू लागली.

चिमणीला पाहून मांजरीने झडप घातली.
एकमेकांना धरायची चढाओढ लागली.
समोरच्या शेटजींचा एक कुत्रा होता.
मुंगळ्याची, चिमणीची मजा पहात होता.
मांजरीला पाहून त्यानेही झडप घातली.
वाणीबुवांनी विटकर कुत्र्याला मारली.
क्यँव क्यँव केकाटत कुत्रा पळून गेला.
कुत्र्याचा मालक शेटजींवर धावून आला.



बाह्या सावरून दोघेजण भांडण करू लागले.
त्यांना पाहून लोक सारे खूप खूप हसले.
" चला शेटजी, पुरे भांडण; दुकानात चला.
खजूर देऊन मला आता करा की हो मोकळा ! "

नारदाचे बोलणे ऐकून वाणी भानावर आला.
" क्षमा करा महाराज ! पाय धरू लागला.
" कळ कशी लागली, ते कळलंच नाही !
मधाचं बोट तुमचं, मुंगळ्याची घाई !
छान युक्ती केली तुम्ही, तंटा आमचा लावला,
हसावं की रडावं, ते कळलं नाही कोणाला ! "
दोघांनाही कळून आली नारदाची कळ,
दोघांनीही तेथून काढला झटकन् पळ.
खजूर घेऊन नारदमुनी घाटावर गेले.
लोक सारे वाण्याला पोट धरून हसले.
कळीचा हा नारद अजूनही फिरतो,
तुमच्या-आमच्यात भांडण लावून निघूनही जातो
तंट्यासाठी खरा काही प्रकारच नसतो.
आपणही सारे नंतर खूप खूप हसतो.

卐 卐 卐

## ६. गरम जांभळे

एकदा एक बादशहा हिंडायला निघाला
त्याच्याबरोबर प्रधान नव्हता—
सेनापती नव्हता, शिपाईसुद्धा नव्हता.
या साऱ्यांचा त्याला—
अगदी कंटाळा आला होता.
म्हणून तो एकटाच हिंडायला निघाला.
बादशहाबरोबर हत्ती नव्हता.
रथ नव्हता की घोडाही नव्हता.
तो पायी पायीच निघाला होता.
बादशहा एकटाच हिंडला.
तो पायी पायीच चालला.
फिरत फिरत तो एका खेड्यात गेला.
वेशीबाहेर जांभळीचे झाड होते.
काही मुले जांभळे पाडीत होती.
रसरशीत, टपोरी, छानदार जांभळे.
मुले चोखून चोखून जांभळे खात होती.
बादशहाच्या तोंडाला पाणी सुटले.

बादशहा म्हणाला, " मुलांनो,
मला देता का जांभळे खायला ? "
मुले म्हणाली, " हो हो, देऊ की ! "
त्यांतला एक मिस्किल मुलगा म्हणाला,
" पण प्रवासी महाराज, आम्हांला सांगा की,
तुम्हांला गरम जांभळे पाहिजेत की थंड ? "
बादशहाला नवल वाटले. तो मनाशी म्हणाला,
" आपण तर नेहमी थंडच जांभळे खातो,
आज या गरम जांभळांची काय
नवीनच भानगड आहे ? पाहू तरी–"
बादशहा म्हणाला, " गरम जांभळे द्या मला ! "
मग एक मुलगा झाडावर चढला.
त्याने पाय देऊन एक फांदी हलविली.
जांभळांचा सडा जमिनीवर पडला.
मिस्किल मुलाने त्यांतील जांभळे उचलली.
या हातावर, त्या हातावर, असे करीत
ती जांभळे प्रवाशाजवळ नेली आणि
एक एक जांभूळ त्याच्या हातावर टाकले.
त्या जांभळांना जमिनीवरील माती लागली होती.
बादशहाने जांभूळ हातात घेतले,
फुंकून फुंकून त्याचा कचरा उडविला
आणि ते तोंडात टाकले.

पण ते जांभूळ गरम नव्हते, थंडच होते.
दुसरे घेतले, फुंकून खाल्ले, गारच लागले.



बादशहा म्हणाला, "कायरे लबाडांनो,
ही जांभळे तर गारच आहेत, गरम नाहीत."
मिस्किल मुलगा म्हणाला,
"वा राव, ताजी ताजी गरम जांभळे,
ती तुम्ही फुंकून फुंकून खाल्ली म्हणून गार झाली."
बादशहा खजील झाला.
काय बोलणार त्या मुलांपुढे !


卐 卐 卐

## ७. जागा चुकली

झाडाखाली बैलोबा बसले होते.
शांतपणाने रवंथ करीत होते.
घास चावायचे, डोळे मिटायचे आणि
पुन्हा घास गिळायचे.
त्या वेळी तेथे एक डास आला.
तो त्या बैलाच्या शिंगावर बसला.
गुणगुण करून गाणे गाऊ लागला.
जोरजोराने खूप वेळ तो गात होता.
पण बैलोबाच्या ते गावीही नव्हते.
त्याचे आपले रवंथ करणे चालूच होते
“ बैलोबाला गाणे आवडत नाही.
आपल्या कलेचे कौतुक होत नाही. ”
म्हणून डासाला खूप वाईट वाटले.
मग त्याने गाण्याचा नाद सोडला.
त्याने तालीम सुरू केली.
जोर काढले, बैठका मारल्या,
बैलोबाच्या शिंगावर खूप उड्या मारल्या.
तरीही बैलाला त्याचे काहीच नाही.
“ आता काय करावे ” डासाला विचार पडला—

" या बैलोबाला आधीच ज्ञान नाही.
त्यात ही शिंगाची कठिण जागा.
येथे काहीही केले तरी याला कळत नाही.
आपण या जागेवर उगीच मेहनत केली.
सगळी मेहनत वाया गेली, आपली जागा चुकली.

बैलाची पाठ मऊ आहे.
ती जागा चांगली आहे.
तेथे जाऊ, आपली कला दाखवू. "
डासाने ठरविले आणि
पाठीवर नजर टाकली.
पण अरे बापरे ! तेथे काय ?



पाठीवर एक माशी बसली होता.
बैलाची शेपटी वळवळत होती.
शेपटीचा फटकारा माशीला बसला.
आणि बसल्या जागेवरच त्या
बिचाऱ्या माशीचा प्राण गेला.

पाठीवरील जागा धोक्याची आहे.
डासोपंतांनी तो धोका जाणला.
मग तो डास बैलाच्या कानाशी गेला.
घिरट्या घालून गुणगुणू लागला.
तरीही बैलोबाचे लक्षच नव्हते.
त्याचे आपले रवंथ करणे चालूच होते.

नंतर डास जोराने म्हणाला,
" काय हो बैलोबा, मी केव्हाचा
तुमच्या शिंगावर बसलो आहे.
किती छान गाणे म्हणालो !
तुम्ही ते ऐकलेच नाही !
तुम्हांला गाण्याची आवड नाही
म्हणून मी शक्तीचे प्रयोग केले.
जोर, बैठका काढल्या, उड्या मारल्या;
तरीही तुम्ही लक्षच दिले नाही !